पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/३७८ /१८
पुणे १ दिनांक :- २३/८ /२०१८

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक

न्यु महाराष्ट्र एज्यु ट्रस्ट न्यु भवानी पेठ पुणे आर्किड प्रायमरी स्कूल 384 भवानी पेठ पुणे 2

विषय:- सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र २४) २ जुलै २०१३

२) शासन निर्णय एसएमएफ१०१७ / प्र क्र १०१४/एसएम-२ दिनांक २/६/२०१५

३) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/ मान्यता /पुवि/१/११७८५ दि.३०/६/२०१६

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| ३ | न्यु महाराष्ट्र एज्यु ट्रस्ट न्यु भवानी पेठ पुणे | आर्किड प्रायमरी स्कूल 384 भवानी पेठ पुणे 2 | इंग्रजी | नविन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ १ ली ते ८ वी सर्व शाखा | २०१० जन् पासून |

अटी व शर्ती

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

४. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये सन २०१६-१७ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.

५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

NO 2

शिक्षण मंडळ कार्यालय पुणे महानगरपालिका
कै भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
शिवाजीनगर,पुणे - ४११००५
जा.क्र /खाप्राशा/ 8339 /१२-१३
दि 11-10-2012

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
न्यू महाराष्ट्र एज्यूकेशन ट्रस्टची ,
ऑर्किड प्रायमरी स्कूल ,
३८४ भवानी पेठ , पुणे २

विषय - सन २०१० -११ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी शाळांना परवानगी देणेबाबत
संदर्भ - १) मा. शिक्षण उपसंचालक , पुणे विभाग पुणे-१ यांचेकडील जा. क्र. प्राशि -३ / खाप्राशा/ मा. इंग्रजी /१६२०७/१२/ दि. ०४.०६.२०१२ चे पत्र
२) मा. शिक्षण मंडळ ठराव क्रमांक 934 दि. 10/e/2012

मा. शिक्षण मंडळ ठ. क्र. 934 दि.10/e/12 नुसार न्यू महाराष्ट्र एज्यूकेशन ट्रस्टची , ऑर्किड प्रायमरी स्कूल ,३८४ भवानी पेठ , पुणे २ या शाळेस सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षात इ. १ ली च्या वर्गास फक्त एका तुकडीस इंग्रजी माध्यमासाठी कायम विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर शाळा सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा. शिक्षण उपसंचालक ,पुणे विभाग, पुणे -१ यांचेकडील दि. ०४.०६.२०१२ चे पत्रातील अटींचे पालन संस्थेने करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी .

11-10-12
शिक्षणप्रमुख
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

प्रत -
मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग , पुणे - १.

कायम विना अनुदान तत्त्वावर
(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू, तामिळ इत्यादी माध्यम)

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
कै.भाउसाहेब शिरोळे भवन,
शिवाजीनगर, पुणे ५
जा.क्र. खाप्राशा ८२०६
दि. २९/२/२०१२

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
ऑर्किड प्रायमरी स्कूल ,
३८४ भवानी पेठ , पुणे ४२

**विषयः-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा तुमच्याकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा /वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक शैक्षणिक वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ऑर्किड प्रायमरी स्कूल , | इंग्रजी | २ री<br>३ री<br>४ थी<br>५ वी | सन २०११-१२<br>सन २०१२-१३<br>सन २०१३-१४<br>सन २०१५-१६ | |

**अटी व शर्ती**

१) शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३) सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८) पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

२०१२/१५
(बी.के.दहिफळे)
प्रशासकीय अधिकारी
शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका

कायम विना अनुदान तत्त्वावर
(मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, तामिळ इत्यादी माध्यम)

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
[illegible]
शिवाजीनगर, पुणे ५
जा.क्र. [illegible] ६८६८
दि. ५/३/१६

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
ऑर्किड स्कूल,
भवानी पेठ, पुणे ४२

विषय:- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्र. पीएलएस.-२००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा तुमच्याकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या ज्यादा/नैसर्गिक वाढीचा /वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक शैक्षणिक वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ऑर्किड स्कूल, | इंग्रजी | ६ वी | २०१५-१६ | |

अटी व शर्ती

१) शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३) सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८) पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.
९) आर. टी. ई. ॲक्ट २००९ चे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

5/3/16
(बी.के.दहिफळे)
प्रशासकीय अधिकारी
शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका

कायम विना अनुदान तत्वावर

शिक्षण मंडळ कार्यालय पुणे महानगरपालिका
कै भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
शिवाजीनगर,पुणे - ४११००५
जा.क /खाप्राशा/ ५११० /१६-१७
दि. २०/१२/१६

प्रति ,
आर्चीड प्रायमरी स्कूल ,
३८४ भवानी पेठ , पुणे

विषय - कायम विना अनुदान तत्वावरील शासनमान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीच्या वर्गाना परवानगी देणेबाबत

संदर्भ - शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस-१००२/(१०००/०२)/प्राशि-३ दि.२३/९/२००३

उपरोक्त विषया संबंधिचा तुमचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीच्या वर्गास खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीस अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक सन |
|---|---|---|---|---|
| १. | आर्चीड प्रायमरी स्कूल , ३८४ भवानी पेठ , पुणे | इंग्रजी | ७ वी | सन २०१६ - १७ |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवळी केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहीजे .
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करून नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५ सदर मंजूर करण्यात येण-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थी संख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असल्याचे निदर्शनास आल्यास तुकडी / वर्गमान्यता रदद करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.
९. आर. टी. ई अॅक्ट २००९ चे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय अधिकारी
शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका

परवानगी वर्ष :-२०१८-२०१९
माध्यम : इंग्रजी
स्वयंअर्थ सहाय्यित शाळा
(माध्यमिक)

जा.क्र.शिउसं/माध्य-३०२/प्र.मा.दर्जावाढ/पुवि/२०१९/ 4849 ~~E~~ 
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक :- 27 JUN 2019

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय :** सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ साठी जून-२०१८ पासून इ. ९ वी व इ. २०१९-२० पासून इ. १० वी चे चे वर्गास प्रथम मान्यता देण्याबाबत.
न्यू महाराष्ट्र एज्युकेशन ट्रस्ट भवानी पेठ, पुणे संचलित ऑर्किड स्कूल, भवानी पेठ,जि.पुणे

**संदर्भ :-**
१) शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्र.एसएफएस-२०१९/प्र.क्र.१३४/एसएम-२, दिनांक २५.२.२०१९
२) या कार्यालयाचे पत्र क्र.शिउसं /माध्य-३०३/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-२०१९/२०५४, दिनांक ११.३.२०१९
३) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/२३५०/२०१९, दिनाक ७.५.२०१९

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **न्यू महाराष्ट्र एज्युकेशन ट्रस्ट भवानी पेठ, पुणे संचलित ऑर्किड स्कूल, भवानी पेठ,जि.पुणे** या माध्यमिक शाळेच्या **इयत्ता ९ वी इ.१०वी** च्या **इंग्रजी माध्यम वर्गासाठी** संदर्भीय क्रमांक १ चे शासन निर्णयानुसार माध्यमिक चे वर्गास दर्जावाढ स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळेस परवानगी जून-२०१८ पासून देण्यात आलेली होती. तदनंतर या कार्यालयाने संदर्भीय क्रमांक २ नुसार माध्यमिक इ. ९ वी व इ. १० वी चे वर्गास दर्जावाढ राज्यमंडळ इंग्रजी माध्यम शाळेसाठी परवानगी सन २०१८-२०१९ पासून दिलेली आहे. आता आपल्या संदर्भीय क्रमांक ३ व्दारे आपण दिलेली स्वयंस्पष्ट शिफारस विचारात घेता **इ. ९ वी सन २०१८-१९ व इ. १० वी चे वर्गास सन २०१९-२०२० पासून इंग्जी माध्यम राज्यमंडळ दर्जावाढ शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वाकरिता प्रथम** मान्यता देण्यात येत आहे.

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२.नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

५.संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करून घेण्यात यावी.

६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

१०.संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१८-१९** पासून असेल

१३.शैक्षणिक वर्ष **२०१८-२०१९ मध्ये** ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य - अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी माध्यम नवीन माध्यमिक शाळा / वर्ग असे** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

१६.महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७.महाराष्ट्र स्वंयअथसह्य्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी

१.शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत

३. शाळेच्या संबधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

**६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष,शर्ती,अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

**७. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम २००९ व नियम २०१६ चे पालन करणे बंधनकारक आहे.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तींची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा

MBRaut
(मिनाक्षी राऊत )
प्र.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१.

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

**१. मुख्याध्यापक, ऑर्किड स्कूल, भवानी पेठ,जि.पुणे**

२. विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

३. अध्यक्ष/सचिव, **न्यू महाराष्ट्र एज्युकेशन ट्रस्ट भवानी पेठ, पुणे संचलित**

४.निवडनस्ती कार्यासन माध्य-३०२